दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 18 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 101 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# लाखो भाविकांच्या उपस्थितीत वैद्यनाथ नगरीत भक्तीचा जागर

# 'हर हर महादेव'च्या जयघोषाने वैद्यनाथ नगरी दुमदुमली

■ परळी (प्रतिनिधी)

पवित्र श्रावण महिन्याच्या पहिल्याच सोमवारी परळी येथील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथ मंदिरात भक्तीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. पहाटेपासूनच देशभरातून आलेल्या लाखो शिवभक्तांच्या गर्दीने परळी नगरी पूर्णपणे 'शिवमय' झाली होती. 'हर हर महादेव' आणि 'ॐ नमः शिवाय' च्या गगनभेदी जयघोषाने मंदिर परिसर आणि संपूर्ण शहर भक्तिरसात न्हाऊन निघाले.

### नैसर्गिक सौंदर्य व भव्य सजावट:


पहिल्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून वैद्यनाथ मंदिराला रंगीबेरंगी सुगंधी फुलांची आरास आणि नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्रीच्या वेळी लखलखणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशात मंदिराचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

### कडक सुरक्षायंत्रणा व नियोजन

■ दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा आणि गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली २७८ पोलीस कर्मचाऱ्यांसह एसआरपीएफ आणि होमगार्डचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा:

■ प्रभू वैद्यनाथ मंदिर हे केवळ धार्मिक श्रद्धेचे ठिकाण नसून, ते प्राचीन परंपरा आणि वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक ठेवा मानले जाते. भाविकांनी प्रशासनाच्या सूचनेनुसार शिस्तबद्ध रीतीने दर्शन घेऊन सण उत्साहात साजरा केला.





### नयनरम्य विद्युत रोषणाई व पुष्पालंकार

■ पहिल्या श्रावणी सोमवारी वैद्यनाथ मंदिरावर विलोभनीय विद्युत रोषणाई आणि मनमोहक रंगीबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली होती. रात्रीच्या वेळी रंगीबेरंगी प्रकाशात उजळून निघालेले मंदिर पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले. शिस्तबद्ध दर्शन आणि कडक बंदोबस्त: वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने चोख नियोजन केले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली एकूण २७८ पोलीस अधिकारी, कर्मचारी, महिला पोलीस, होमगार्ड आणि एसआरपीएफच्या जवानांचा कडक बंदोबस्त तैनात होता.

### धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व

■ परळी वैद्यनाथ हे केवळ ज्योतिर्लिंग नसून प्राचीन धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्र आहे. माता पार्वती, श्री गणेश आणि भगवान शंकराच्या उपासनेची परंपरा तसेच वारकरी संप्रदायातील संतांचे स्थान यामुळे या क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

# आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराचा सकारात्मक परिणाम; महाआरोग्य शिबिरातून रुग्णांना नवजीवन

## शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष केदार यांच्यावर ५ लाखांपर्यंतची मणक्याची शस्त्रक्रिया मोफत



### आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आ.सुरेश धस ठरताहेत आधार

■ आष्टी विधानसभा मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या उपचारांसाठी आयुष्यमान भारत योजना, मुख्यमंत्री सहायता निधी तसेच इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत आहे. आष्टीतील महाआरोग्य शिबिरात केवळ तपासणी न करता गंभीर आजार असलेल्या गरजू रुग्णांची निवड करून त्यांच्या पुढील उपचार व शस्त्रक्रियांची व्यवस्था केली जात असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. "महाआरोग्य शिबिर हे केवळ एक दिवसाचे शिबिर न राहता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष उपचार मिळवून देणारे अभियान ठरत आहे," अशी भावना रुग्णांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

■ आष्टी (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा सकारात्मक परिणाम आता प्रत्यक्ष रुग्णांच्या जीवनावर दिसून येत आहे. शिबिरात तपासणी करून निवड झालेल्या गरजू रुग्णांवर विविध रुग्णालयांत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. याच उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष देवराव केदार यांच्यावर अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली.

वारणी येथील सुभाष केदार हे महाआरोग्य शिबिरासाठी आले असता त्यांच्या आजाराची तातडीने दखल घेण्यात आली. कार्यकर्ते श्रीराम केदार यांनी त्यांच्या उपचाराबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे माहिती दिल्यानंतर त्यांनी तात्काळ आवश्यक मदत व उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सुभाष केदार यांना १० ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्यावर मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया करण्यात आली आणि उपचारानंतर १५ ऑगस्ट रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

या उपचारासाठी अंदाजे ४ लाख ५० हजार ते ५ लाख रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत संपूर्ण उपचाराचा खर्च झाल्याने केदार कुटुंबावर कोणताही आर्थिक भार पडला नाही. विशेष म्हणजे रुग्णालयातील नोंदणीसाठी भरलेली ५५० रुपयांची फी देखील परत करण्यात आली. त्यामुळे महागडी शस्त्रक्रिया होऊनही सुभाष केदार यांना उपचारासाठी अक्षरशः एक रुपयाही खर्च करावा लागला नाही.

#### महाआरोग्य शिबिरातून आणखी दोन रुग्णांवर गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया

आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित महाआरोग्य शिबिरात निवड झालेल्या आणखी दोन गरजू रुग्णांवर अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री रुग्णालयात गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या.

आष्टी तालुक्यातील कर्हेवडगाव येथील गोपीनाथ मारुती सानप आणि पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील महादेव नरसिंग चव्हाण यांच्यावर गुडघ्याच्या मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. साईदीप सह्याद्री रुग्णालयाचे चेअरमन डॉ. दीपक किरण यांच्या सहकार्याने डॉ. नालकर यांनी या शस्त्रक्रिया केल्या.

शस्त्रक्रियेनंतर सानप व चव्हाण यांनी आमदार सुरेश धस, डॉ. दीपक किरण, डॉ. नालकर तसेच उपचारासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. "आता आम्ही पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो," अशी भावना व्यक्त करत त्यांनी महाआरोग्य शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. रुग्णसेवक विकास साळवे व अमर वाळके यांनीही उपचार प्रक्रियेत मदत केली.

# शरद रेडेकर यांची वैद्यकीय सहाय्यता कक्ष सदस्य पदी नियुक्ती

### आ. सुरेश धस यांच्या वतीने महत्त्वाची जबाबदारी; गरजू रुग्णांना शासकीय वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार

■ आष्टी (प्रतिनिधी)

पत्रकारिता आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडणारे पत्रकार शरद रेडेकर यांची आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वतीने 'वैद्यकीय सहाय्यता सेवक' म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे आर्थिक परिस्थितीअभावी उपचारांपासून वंचित राहणाऱ्या तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त गरजू रुग्णांना शासनाच्या विविध वैद्यकीय सहाय्य योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक सर्वसामान्य कुटुंबांना गंभीर आजार, मोठ्या शस्त्रक्रिया किंवा महागड्या उपचारांचा आर्थिक भार सहन करणे कठीण जाते. अशा परिस्थितीत संबंधित रुग्णांना योग्य मार्गदर्शन मिळणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आणि शासनाच्या वैद्यकीय सहाय्य योजनांशी त्यांचा समन्वय साधणे, या दृष्टीने शरद रेडेकर यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून जनहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडणारे रेडेकर आता वैद्यकीय सहाय्याच्या माध्यमातूनही गरजू रुग्णांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार आहेत. दुर्धर आजारांनी त्रस्त रुग्ण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे आणि उपचारांसाठी मदतीची गरज असलेल्या नागरिकांना शासनाच्या उपलब्ध वैद्यकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील राहणार आहेत.



आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मतदारसंघातील आरोग्यसेवेला अधिक बळ देण्याच्या प्रयत्नांना रेडेकर यांच्या नियुक्तीमुळे आणखी गती मिळणार असल्याचे मानले जात आहे. 'रुग्णसेवा हीच समाजसेवा' या भावनेतून ही जबाबदारी पार पाडण्याचा निर्धार शरद रेडेकर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शरद रेडेकर यांच्या या नियुक्तीबद्दल आष्टी तालुक्यातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पत्रकारितेसोबतच आता वैद्यकीय सहाय्याच्या माध्यमातूनही अधिक व्यापक समाजसेवा त्यांच्या हातून घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# वैद्यनाथ देवस्थानचा ऐतिहासिक निर्णय

## मोफत अन्नछत्रानंतर आता श्रावणात भाविकांना मेरुगिरी यात्री निवासात मोफत मुक्काम!

■ परळी वैजनाथ (विशेष बातमीपत्र)

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथाच्या चरणी लीन होण्यासाठी येणाऱ्या लाखो भाविकांसाठी देवस्थान ट्रस्टने अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. आगामी श्रावण महिन्यातील प्रचंड गर्दी लक्षात घेता, मंदिरापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या निसर्गरम्य 'मेरुगिरी यात्री निवासात' भाविकांना पूर्णपणे मोफत राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**भोजन आणि निवासाची मोफत सोय :**

परळीत येणाऱ्या परगावच्या भाविकांना आता निवासाच्या खर्चापासून पूर्ण मुक्ती मिळणार आहे. देवस्थानच्या वतीने आधीपासूनच मोफत अन्नछत्र चालवले जाते. आता भोजन आणि निवास या दोन्ही मूलभूत सुविधा मोफत मिळाल्याने सामान्य भाविकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. अडीच ते तीन हजार भाविकांची सोय: मेरुगिरी येथील या जुन्या यात्री निवासात एकाच वेळी सुमारे २५०० ते ३००० भाविक राहू शकतील अशी अथांग क्षमता आहे. निसर्गरम्य वातावरणातील हे निवासस्थान मंदिराच्या अत्यंत जवळ असल्याने भाविकांचा येण्या-जाण्याचा वेळ आणि त्रास वाचणार आहे.

**येत्या ४-५ दिवसांत सेवेत दाखल**

सध्या या यात्री निवासात दुरुस्ती, रंगरंगोटी आणि आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा पुरवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील ४ ते ५ दिवसांत हे निवास स्थान भाविकांसाठी खुले करण्यात येईल, अशी अधिकृत माहिती वैद्यनाथ देवस्थान कमिटीचे सचिव राजेश देशमुख यांनी दिली.

### ८५ खोल्यांचे नवीन भव्य भक्तनिवास सज्ज

■ देवस्थानकडे असलेल्या एकूण ५ भक्तनिवासांपैकी एका अत्याधुनिक आणि भव्य भक्तनिवासाचे काम पूर्ण झाले असून त्यात ८५ खोल्या आहेत. हे नवीन भक्तनिवास देखील लवकरच सेवेत दाखल होणार असल्याने श्रावण व महाशिवरात्रीतील गर्दीचे व्यवस्थापन अधिक सुलभ होईल.








# व्यक्तिमत्त्व विकासासाठी...

# मार्गदर्शन शिबीर



मार्गदर्शन शिबिराद्वारे विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाते. अशावेळेस विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्ती विद्यार्थ्यांना विविध विषयात असणाऱ्या प्रश्नांचे निरसन करतात. शिवाय विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी मार्गदर्शन करतात. या शिबिरात विद्यार्थी त्यांच्या अडचणी, समस्या या दिलखुलासपणे त्या वक्त्यांशी बोलून सोडवू शकता.

## वैयक्तिक चर्चा

या चर्चेमध्ये विद्यार्थ्यांशी समुपदेशक स्वतः गप्पा मारतात. विद्यार्थ्यांच्या अडचणी, त्यांच्या समस्या जाणून घेतात. अगदी मित्रत्वाच्या नात्याने ते त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करतात. शिवाय

## ॲप्टिट्यूड टेस्ट

पुढील भविष्यात करिअरसाठी कोणता मार्ग निवडावा याबाबतीत जवळपास सर्वच विद्यार्थी विचारात असतात. अशावेळेस या ॲप्टिट्यूड टेस्ट उपयोगी वर्षाच्या सुरुवातीलाच ही ॲप्टिट्यूड टेस्ट देणे गरजेचे असते.



## आत्मविश्वास सेशन

या सेशनमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात, जेणेकरून त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. यामध्ये विविध कार्यक्रम असतात. लोकांशी कसे बोलावे, आपले विचार इतरांना कसे पटवून द्यावे, आपल्या मनातील भीती कशी दूर करावी इत्यादी. या कार्यक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास बळवल्याचे निदर्शनास आल्याने बहुतेक महाविद्यालयात हा उपक्रम राबविला जातो. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालय व समुपदेशक प्रोत्साहन देतात.

## वेळेचे नियोजन

हा भाग येतो ते व्यक्तिमत्त्व विकासाची सुधारणा करण्याच्या क्षेत्रात. आताची पिढी ही घडाळयाच्या काट्यावर चालणारी आहे. त्यामुळे वेळेचे नियोजन असणे फार गरजेचे असते. दैनंदिन जीवनात व्यस्त दिनक्रमामुळे सगळ्या गोष्टींकडे लक्ष देणे फारसे जमत नाही, त्यामुळे अशावेळेस वेळेचे नियोजन कसे करावे? कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यावे? कोणत्या गोष्टीसाठी किती वेळ खर्ची करावा? शिवाय विद्यार्थ्यांच्या परीक्षा काळातही हे वेळेचे नियोजन फार महत्त्वाचे ठरते. कारण किती वेळात किती उत्तरे लिहून झाली पाहिजेत यापासून ते कोणत्या प्रश्नासाठी आपण किती वेळ खर्ची केला पाहिजे हे यामध्ये शिकवले जाते.

## इंटरव्ह्यू सेशन

इंटरव्ह्यू सेशन म्हणजे मुलाखत हा मानसोपचार उपचारामधला महत्त्वाचा टप्पा. प्रत्येकवेळी गेल्या वेळच्या सत्राचा आढावा घेतला जातो. आता विद्यार्थ्यांना कसे वाटतेय? रुग्णाच्या प्रगतीविषयी मानसोपचार तज्ज्ञाला काय वाटते आहे याविषयी चर्चा केली जाते आणि या चर्चेमधून पुढे काय पावले उचलावीत हे ठरवले जाते. इंटरव्ह्यूमध्ये विद्यार्थ्यांचा इतिहास समजून घेतला जातो. त्यामुळे त्याच्या आताच्या वागण्याची उकल होते. यात निरनिराळे प्रश्न असतात. अगदी छंद कोणता इथपासून ते भविष्यात काय बनण्याची इच्छा आहे इथपर्यंत हे प्रश्न असतात. इंटरव्ह्यू सेशन फक्त मानसोपचारासाठीच न करता व्यक्तिमत्त्व विकासासाठीही केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास बळावतो शिवाय त्याच्या मनात असलेली भीती दूर होते.

विद्यार्थ्यांना असणाऱ्या शैक्षणिक विषयांबाबतच्या अडचणीवरूनही ते त्या त्या संबंधित प्राध्यापकांशी बोलून विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी करतात. कधी कधी महाविद्यालयीन वयात अनेकवेळा आपल्या आवडत्या व्यक्तीचा दुरावा झाल्याच्या घटनाही घडतात; परंतु या गोष्टी ते इतरांशी मनमोकळेपणाने बोलू शकत नाहीत, त्यामुळे अशावेळेस समुपदेशक मित्राची भूमिका बजावतात. त्यांना बोलके करतात.


येतात. या परीक्षेत एकूणच सर्वच सामाजिक ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले जातात. कला, क्रीडा, विज्ञान, साहित्य, गणित, वाणिज्य या विषयांपैकी ज्या विषयात आपण जास्त गुण मिळवतो त्यातच करिअर करण्याचा मार्ग समुपदेशक सांगतात. कधी कधी आपली आवड आणि आपली एखाद्या विषयातील पारंगतता निराळी असू शकते. त्यावेळेस समुपदेशक त्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण ज्ञानावरून कोणता मार्ग सुकर होऊ शकतो याचे मार्गदर्शन करतात. त्यामुळे

## एकाग्रता

एकाग्रता हा मन शुद्ध व शांत करण्याचा महत्त्वाचा घटक. एकाग्रता नसल्यास कोणतीच गोष्ट पूर्ण होऊ शकत नाही, त्यामुळे एकाग्रता कशी साधावी? त्यासाठीचे व्यायाम, प्राणायाम व इतर उपाय यांची शिकवण या सेशनमध्ये दिली जाते. अभ्यासात मागे असणे, अभ्यासक्रमातल्या छोटया गोष्टीही न समजणे, एकाचवेळी मनात अनेक विचार येणं यामुळे काही वेळा विद्यार्थ्यांची मनःस्थिती खालावू शकते. त्यावेळी त्यांनी कशाप्रकारे मन एकाग्र केले पाहिजे याच्या सोप्या सोप्या पद्धती या सेशनमध्ये सांगितल्या जातात.

# स्वप्नांना द्या वेळ

‘स्वप्न’ हा एक शब्द जो आपण सतत ऐकत असतो, म्हणजे लहानपणापासून या शब्दासोबत जोडल्या जाणाऱ्या संकल्पना फार वेगळ्या असतात; पण जस जसे आपण मोठे होतो तस तसे आपण या शब्दाला अजून बरेच असे वेगळे स्वरूप देऊ लागतो. समजा स्वप्न म्हणजे नेमके काय असा आत्ता मला प्रश्न विचारला तर माझे सध्या एक उत्तर असेल, पण हाच प्रश्न मला अजून १० वर्षानंतर विचारला तर माझे कदाचित वेगळे उत्तर असेल.



तरुण वयातल्या उमलत्या मनामध्ये डोळ्यात अनेक स्वप्ने साठलेली असतात. ही स्वप्ने साकारण्याचा जो तो आपल्या परीने प्रयत्न करत असतो. पण तरुण वयात एखादी इच्छा पूर्ण झाली नाही किंवा अडचणी आल्या तरी हताश होऊ नये.



पण आत्ता या वयात आपले प्रत्येकाचेच स्वप्न असते ते आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहायचे, स्वतःचे असे काहीतरी तयार करायचे, पण हे सगळे करत असताना सतत मनात एक तगमग असते की आपण करतोय ते योग्य आहे की नाही, आपण पाहिलेले स्वप्न पूर्ण होईल की नाही? लोकांना आवडेल का? असे अनेक प्रश्न मनात ठेवून आपण त्या स्वप्नाला आपल्या मनातच दाबून ठेवतो.

पण ते स्वप्न पूर्ण होण्यासाठी आधी त्याला मोकळे सोडले तर पाहिजे, आपण जर त्याला असे गच्च पकडून ठेवले तर ते पूर्ण तरी कसे होईल? या सगळ्या काळात कदाचित थोडा वेळ लागेल; पण तो वेळ आपल्या परीक्षेचा काळ म्हणून आपण पाहिला तर आपल्याला नक्की त्रास होईल; पण त्या काळानंतर येणारे यश, काहीतरी मिळवल्याचे सुख ते बरेच काही देऊन जाईल.

असे म्हणतात, देव जर एक दार बंद करतो तर दुसरे उघडतो. स्वप्नपूर्तीसाठी सगळी दारे कधीच बंद होत नाहीत तर कुठेतरी एखादी खिडकी उघडी असते. आपण फक्त ती बघून ओळखावी लागते. पण या सगळ्या काळात जो आपल्या सोबत असतो त्याला आपण कधी विसरायचे नाही. गरजेचे नाही की तो एखादा माणूसच असेल. ती एखादी जागा असेल किंवा एखादे गाणेही असेल. पण या कठीण काळाची, आपल्या श्रमांची आठवण या सोबतीमुळे आपल्याला चिरकाल राहते. आपल्याला आपला आनंद शोधण्याचा मार्ग सापडला की सगळीच गणिते सोपी होतात. कदाचित आत्ता तुमच्या स्वप्नांच्या पाठी असताना, एखादे गाणे ऐकताना ते गाणे, त्यातील कल्पना सत्यात येणे शक्य नाही असेही वाटेल. पण तुमच्या आकांक्षा पूर्ण होतील तेव्हा ते गाणे नव्याने तुम्हालाच उमगेल. स्वप्न एक ना एक दिवस पूर्ण होतेच; पण त्या स्वप्नापर्यंत पोहोचताना केलेला प्रवास जास्त आनंद देऊन जातो.



# व्यवसाय सुरू करताना...

व्यवसाय सुरू करणे सोपे असले, तरी तो बाजारात टिकविणे कठीण आहे. यासाठी खूप कष्ट करावे लागते. यशस्वी व्यवसाय सुरू करण्यासाठी पुढील गोष्टींकडे व्यावसायिकाने लक्ष देणे आवश्यक आहे.

## मागणीनुसार विक्री

ग्राहकांच्या मागणीनुसार विक्री करा. केवळ आपल्या पसंतीचा विचार करू नका. ग्राहकांचा विचार तुम्ही केला नाही तर ते तुमचे उत्पादन विकत न घेण्याची शक्यता असते. त्यामुळे तुमच्या उत्पादनाला बाजारात मागणी आहे की नाही ते तपासून पाहा.

## योजना आखा

व्यवसायविषयक योजना आखा. गुंतवणूकदार आणि विक्रेत्यांना तुमच्या व्यावसायाजवळ आकर्षित करण्याचा हा उत्तम मार्ग आहे. एक उत्तम व्यवसायाची योजना तुमच्या नोंदी आणि ध्येय लक्षात ठेवण्यासाठी मदत करते. तुमची योजना प्रसिद्ध करा. उत्पादन विक्रीविषयक योजना आखा. ग्राहकांना आकर्षित करण्याची ही एक गुरुकिल्ली आहे. उत्पादने विकण्यासाठी नवीन ग्राहक कसे मिळवाल आणि त्यांना परत येण्यासाठी कसे भाग पाडाल याचा विचार करा.



## व्यावहारिक विचार

तुमचे सामर्थ्य ओळख तुमच्या सामर्थ्यावर लक्ष केंद्रित करा आणि बाकी सर्व सोडून द्या. तुम्हाला इतर उत्तरे माहीत असण्याची जरूरी नाही तुम्ही काय करू शकता आणि काय नाही याचा व्यावहारिक विचार करा अनभिज्ञ असताना त्याबद्दल विचारपूस केलेली केव्हाही बरीच. विविध माध्यमांच्या आधारे ग्राहकांच्या मागणीविषयी संशोधन करा. साधनांच्या कक्षेत व्यवसाय करा. तुम्ही बजेटवर लक्ष ठेवले पाहिजे नाहीतर तुम्ही भयंकर कर्जबाजारी होऊ शकता सगळ्याच गोष्टी तुम्ही स्वतः करू शकत नाही. लहान-लहान गोष्टी पूर्ण करण्यासाठी जितके मदतीचे हात असतील तितकाच व्यवसायाच्या विस्तारला कमी वेळ लागतो. मित्र आणि कुटुंबियांकडून मदत आणि सल्ला मागताना घाबरू नका.

# बनवा स्वतंत्र ओळख

सध्याचे युग स्पर्धेचे आहे, या युगात आपल्याकडे केवळ उच्च शैक्षणिक पात्रता असून भागत नाही. उच्च शैक्षणिक पात्रतेबरोबरच आपल्याला अनेक गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. या हेतूनेच आपली स्वतंत्र ओळख निर्माण होणे आवश्यक असते. अभियांत्रिकी, वैद्यकीय या क्षेत्रातील पदवी मिळवली की, पूर्वी मोठ्या पगाराच्या नोकरीची हमी असायची. आता तसे दिवस राहिलेले नाहीत. या पदवी परीक्षांमध्ये आपण प्रथमवर्ग मिळवला तरी आपल्याला चांगली नोकरी मिळेल याची शाश्वती नाही. त्यामुळे अशा पदव्या मिळाल्यानंतरही आपण वेगवेगळ्या प्रकारचे कोर्सेस पूर्ण केले पाहिजेत.



## आपले वेगळेपण दाखवा

या कोर्सेसद्वारे आपला सीव्ही अन्य उमेदवारांच्या तुलनेत वजनदार बनेल. हे कोर्सेस व्यवसाय व्यवस्थापनाचे असतील किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे असतील. उमेदवारांनी सॉफ्टवेअरच्या काही लँग्वेजचे शिक्षण घेतले तरी त्याचा नोकरी मिळवण्यासाठी फायदा होऊ शकतो. अलीकडच्या काळात इंजिनिअरिंगची पदवी मिळवलेल्या तसेच सी.ए. झालेल्या अनेकांनी व्यवसाय व्यवस्थापनाची म्हणजेच एमबीएची पदवी मिळवलेली आहे. या पदवीधरांनी व्यवस्थापन शास्त्राची पदवी मिळाल्याने ते अन्य उमेदवारांपेक्षा वेगळे ठरले. म्हणूनच आपण इतर उमेदवारांपेक्षा कसे वेगळे ठरू, याचा विचार करणे आवश्यक ठरते.

## तांत्रिक कौशल्ये करा आत्मसात

यापेक्षा वेगळे शिक्षण घेणाऱ्यांना करिअरमध्ये यशस्वी ठरण्याकरिता आपल्यातील वेगळेपण प्रकर्षाने जाणवून द्यावे लागते. त्याकरिता अनेक तांत्रिक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. विज्ञान अथवा वाणिज्य शाखेची पदवी मिळवून नोकऱ्या मिळण्याचे दिवस केव्हाच संपले आहेत. या पदवीला तांत्रिक कौशल्याची जोड दिली तर नोकरी मिळणे सोपे होईल. अनेकांना शाळा, कॉलेजमध्ये असताना न्यूनगंडाची बाधा झालेली असते. वास्तविक प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही चांगले गुण, सामर्थ्य, सकारात्मक बाजू असतातच. हे गुण, सामर्थ्य आपल्याला ओळखता आले पाहिजेत.

## स्वतःतील गुण ओळखा

अनेकांमध्ये कला, साहित्य, तंत्रकौशल्य याची प्रतिभा दडलेली असते. शाळा, कॉलेजच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक कौशल्ये अवगत असतात. या तांत्रिक कौशल्यांचा वापर करून आपली स्वतंत्र आणि वेगळी ओळख निर्माण करता येणे शक्य आहे. मित्रमैत्रिणींच्या तुलनेत स्वतःला कमी लेखत बसण्या ऐवजी इतरांपेक्षा आपल्यात कोणते वेगळे गुण आहेत, हे शोधून काढण्यास सुरुवात करा.

## अतिरिक्त अभ्यासक्रमांना प्रवेश

आपल्याकडे कला, कौशल्याच्या प्रांतातील ज्ञान असेल, माहिती असेल तर हे ज्ञान अधिक व्यापक करण्यासाठी आवश्यक असलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश घ्या. अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्याने तुमचे ज्ञान अधिक परिपूर्ण होईल. त्याचा उपयोग तुम्हाला नोकरी मिळवण्यासाठी अथवा तुम्ही निवडेलल्या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी करता येईल.

## नव्या गोष्टी शिका

केवळ अभ्यासक्रमाचे शिक्षण घेऊन थांबू नका. तर त्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळवण्यासाठीही सतत कार्यरत रहा. म्हणजे तुम्हाला वाहने दुरुस्त करण्याची आवड असेल, तर या कामाचा अनुभव मिळवण्यासाठी प्रयत्न करा. प्रसंगी त्याकरिता विनावेतन काम करण्याची तयारी ठेवा. कोणत्याही शैक्षणिक पात्रतेपेक्षा तुम्हाला त्या कामाचा असलेला अनुभव हा नोकरी मिळवण्यासाठी तसेच व्यवसाय करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरत असतो. अभ्यासक्रमामधील पुस्तकी ज्ञानाने आपण परिपूर्ण होत नाही. याची जाणीव ठेवून प्रत्यक्ष व्यवहारातील ज्ञान मिळवण्याच्या दिशेने प्रयत्नशील राहा. नोकरी मिळाल्यावर आपण ज्या विभागात काम करीत आहोत, त्या विभागाखेरीज अन्य विभागातील कामाची माहिती करून घ्या. त्याकरिता आपल्याला नवनव्या गोष्टींची माहिती करून घेण्याकरिता कुतूहल दाखवले पाहिजे.

## संगणकाविषयी आणखी माहिती

तुम्ही मार्केटिंग विभागात नोकरी करत असाल तर संगणक विभागाच्या कार्यपद्धतीची फावल्या वेळेत माहिती करून घेण्यास शिका. संगणकातील बारीकसारीक दोष कसे दूर करावेत, यासारखी माहिती संबंधित विभागातील सहकाऱ्यांकडून आपल्याला मिळवता येईल. असे केल्याने आपल्याला अन्य विभागाच्या कामाचीही माहिती आहे, हे व्यवस्थापनाला कळू शकते. हळूहळू या ज्ञानाचा वापर करत आपण त्या विषयातील अधिक माहिती अथवा कौशल्य मिळवू शकता. ही तुमची अतिरिक्त शैक्षणिक पात्रता तुम्हाला नोकरीमध्ये बढती मिळवून देण्यास साहाय्यकारी ठरू शकते.



# ब्रेकअपनंतर पुन्हा ...

ब्रेकअप झाल्यानंतर खूप दुःख होते. या काळात सर्व आयुष्य थांबल्यासारखे वाटते. ब्रेकअपचा विषय तुम्ही मैत्रिपूर्ण पद्धतीने घेतला असला, तरी मनात दुःखाची भावना असते. अशा स्थितीत सोडून गेलेल्या जोडीदाराबद्दल तुम्ही बदल्याची भावना दाखविण्याऐवजी, तुम्ही सकारात्मक गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे. ब्रेकअपनंतर जीवनात पुन्हा ट्रॅकवर येण्यासाठी या गोष्टी ध्यानात घ्या.

## तो इतिहास होता


तुमच्या एक्स बॉयफ्रेंडबद्दल विचार करणे टाळा. तो इतिहास होता. तो कुणाबरोबर डेट करेल, तो आता काय करेल असे विचार करून त्याच्यावर लक्ष केंद्रीत करू नका. यामुळे नकारात्मक भावना वाढीस लागतात. तुम्ही स्वतःकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

## मित्र म्हणून राहणे अपवादात्मक

तुमच्या एक्स बॉयफ्रेंडसोबत ब्रेकअप झाल्यानंतरही तुम्ही चांगले मित्र म्हणून राहणे फारच अपवादात्मक प्रकरणांमध्ये होते. तुमचा एक्स बॉयफ्रेंड दुसऱ्या कुणासोबत डेटिंग करतोय हे माहिती असूनही तुम्हाला काही वाटत नसेल, मनाला वेदना होत नसतील, तर ठीक आहे. मात्र, त्याला तुमच्याशी मैत्री कायम ठेवयची असेल पण ते तुम्हाला कम्फर्टेबल वाटत नसेल, तसेच तुम्हा दोघांत आता कोणतेही नाते राहू नये. असे तुम्हाला वाटत असेल, हे संबंध पूर्णपणे संपवून टाका.

## चांगले असल्याचे नाटक करू नका

भावना बाहेर पडू द्या. दुःख दाबून ठेऊ नका. रडणे म्हणजे वाईट गोष्ट नाही. तुमच्या भावना स्पष्ट होण्याची गरज असते आणि त्या स्पष्ट होऊ द्या. तुमचे मन कोणाजवळ तरी मोकळे करा. ब्रेकअपमुळे तुम्हाला काही फरक पडलेला नाही, असे नाटक केल्याने काही उपयोग होत नाही. फक्त लोकांसमोर ओरडू नका, स्वतःला अभिव्यक्त होण्यासाठी निवांत वेळ द्या.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक खर्चाच्या प्रकल्पांना नवी कार्यपद्धती लागू

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे दर्जेदार, वेळेत, पारदर्शक आणि अधिक जबाबदारीने पूर्ण व्हावीत, यासाठी कंत्राटदारांच्या प्रत्यक्ष कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून त्यानुसार रेटिंग देण्याची नवी कार्यपद्धती सार्वजनिक बांधकाम विभागात लागू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मोठ्या पायाभूत प्रकल्पांच्या अंमलबजावणीत गुणवत्ता, वेळेचे नियोजन आणि उत्तरदायित्वाला अधिक महत्त्व प्राप्त होणार आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. सध्या निविदा प्रक्रियेत कंत्राटदाराची तांत्रिक व आर्थिक क्षमता तपासली जाते. त्यासोबतच आता संबंधित कंत्राटदाराने प्रत्यक्ष प्रकल्प राबविताना केलेल्या कामाची गुणवत्ता, निर्धारित वेळेचे पालन, सुरक्षा उपाययोजना, करारातील अटींची पूर्तता आणि एकूण प्रकल्प व्यवस्थापन यांचेही वस्तुनिष्ठ व पुराव्याधारित मूल्यमापन केले जाणार आहे. सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या कंत्राटदारांना प्रोत्साहन देणे आणि अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या कंत्राटदारांना भविष्यातील निविदांमध्ये प्रतिबंधित करणे, हा या कार्यपद्धतीचा प्रमुख उद्देश मंत्री भोसले यांनी सांगितले. ही नवी कार्यपद्धती ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक अंदाजित प्रकल्प खर्च अथवा निविदा मूल्य असलेल्या आगामी प्रकल्पांच्या निविदांना लागू राहणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांसोबतच शासकीय महामंडळे, प्राधिकरणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महानगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था, सिडको, जलसंपदा विभाग, महा-मेट्रो, म्हाडा, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर संबंधित विभाग, मंडळे, प्राधिकरणे आणि महामंडळांना ही कार्यपद्धती लागू राहणार आहे. ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक खर्चाच्या प्रकल्पांसाठी निविदा दाखल करणाऱ्या कंत्राटदाराला त्याने यापूर्वी केलेल्या किंवा सुरू असलेल्या पात्र प्रकल्पांचे वैध कामगिरी प्रमाणपत्र/उत्कृष्ट कार्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र मुख्य अभियंता किंवा समकक्ष दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडून जारी केले जाणार आहे. या प्रमाणपत्रामध्ये प्रकल्पातील विलंब, विलंबाचे स्वरूप व प्रमाण, कामाची गुणवत्ता, गुणवत्ता नियंत्रणाच्या निकषांचे पालन आणि कंत्राटदाराची एकूण कामगिरी यांचे मूल्यांकन केले जाणार आहे. कामगिरी प्रमाणपत्राची वैधता १२ महिने राहणार आहे. वैध प्रमाणपत्राशिवाय तांत्रिक पात्रतेसाठी दाखल केलेला संबंधित प्रकल्प ग्राह्य धरला जाणार नाही.

### कंत्राटदारांच्या कामगिरीचे १०० गुणांमध्ये मूल्यांकन

- **कंत्राटदाराच्या प्रत्येक पात्र प्रकल्पाचे १०० गुणांच्या आधारे मूल्यांकन केले जाणार आहे. त्यामध्ये—**
- **वेळेत काम पूर्ण करणे – ३० गुण**
- **कामाची गुणवत्ता – ६० गुण**
- **देखभाल कालावधीतील कामगिरी / सुरू असलेल्या प्रकल्पांची एकूण कामगिरी – १० गुण अशा प्रकारे गुणांकन केले जाणार आहे.**

कामाच्या गुणवत्तेला सर्वाधिक ६० गुण देण्यात आले आहेत. मंजूर तपशील व गुणवत्ता हमी आराखड्याचे पालन, प्रयोगशाळा आणि क्षेत्रीय चाचण्यांचे निकाल, विसंगती अहवालांची पूर्तता तसेच संरचनात्मक व कार्यात्मक कामगिरी यांचा त्यामध्ये समावेश आहे. कंत्राटदाराच्या पात्र प्रकल्पांच्या कामगिरी प्रमाणपत्रांवर आधारित भारित सरासरी गुण काढून त्यानुसार श्रेणी निश्चित केली जाणार आहे. त्यानुसार कंत्राटदारांचे तीन वर्ग करण्यात आले आहेत.

- **८० पेक्षा अधिक गुण – हरित श्रेणी**
- **६० पेक्षा अधिक आणि ८० पेक्षा कमी गुण – पिवळी श्रेणी**
- **६० पेक्षा कमी गुण – लाल श्रेणी**

हरित श्रेणीतील कंत्राटदारांना निविदेतील सामान्य अटी लागू राहतील. पिवळ्या श्रेणीतील कंत्राटदारांसाठी कामगिरी हमी आणि अतिरिक्त कामगिरी हमी ही निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या प्रमाणाच्या १.१० पट निश्चित केली जाईल. तर लाल श्रेणीतील कंत्राटदार निविदा प्रक्रियेसाठी अपात्र ठरतील.कंत्राटदारांच्या कामगिरीचे मूल्यांकन करताना केवळ व्यक्तिनिष्ठ मतांना महत्त्व न देता, अधिकृत व पडताळता येणाऱ्या प्रकल्प नोंदींच्या आधारे गुणांकन केले जाणार आहे. यामध्ये मासिक प्रगती अहवाल, गुणवत्ता व सुरक्षा चाचणी अहवाल, विसंगती नोंदवही, स्थळ तपासणी अहवाल, स्वतंत्र अभियंता आणि प्राधिकरण अभियंता यांचे अहवाल, प्रगती आढावा बैठकीचे इतिवृत्त, काम पूर्णत्व प्रमाणपत्र, दोष दुरुस्तीच्या नोंदी, प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणालीतील माहिती आणि डिजिटल बांधकाम नोंदी यांचा आधार घेतला जाणार आहे. यामुळे कंत्राटदारांच्या कामगिरीचे मूल्यांकन अधिक पारदर्शक, वस्तुनिष्ठ आणि पुराव्याधारित होणार असून, व्यक्तिनिष्ठ निर्णयांमुळे निर्माण होणारे अनावश्यक वाद कमी करण्यास मदत होणार आहे. प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र ३० गुणांचे मूल्यांकन केले जाणार आहे. पूर्ण झालेला प्रकल्प निर्धारित वेळेत किंवा त्यापूर्वी पूर्ण केल्यास पूर्ण ३० गुण मिळतील. कंत्राटदाराच्या नियंत्रणाबाहेरील आणि मान्य करण्यात आलेल्या विलंबाचा स्वतंत्रपणे विचार केला जाणार आहे. सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये मंजूर वेळापत्रकाच्या तुलनेत प्रत्यक्ष भौतिक प्रगतीचा विचार करून गुणांकन केले जाणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची गती कायम ठेवणे आणि निर्धारित वेळेत काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांना प्रोत्साहन मिळणार आहे. कामाच्या गुणवत्तेसाठी असलेल्या ६० गुणांमध्ये तपशील आणि गुणवत्ता हमी आराखड्याचे पालन, प्रयोगशाळा व क्षेत्रीय चाचण्यांमधील यशस्वी प्रमाण, एनसीआर वेळेत बंद करणे तसेच संरचनेची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि अंतिम दर्जा यांचा समावेश आहे. त्यामुळे केवळ प्रकल्प पूर्ण करणे हा कंत्राटदाराच्या कामगिरीचा निकष राहणार नसून, दर्जेदार आणि टिकाऊ पायाभूत सुविधा निर्माण करणे हा त्याच्या कामगिरीचा महत्त्वपूर्ण भाग ठरणार आहे. कंत्राटदाराचे अंतिम मानांकन एखाद्या एकाच प्रकल्पाच्या कामगिरीवर आधारित राहणार नाही. तांत्रिक पात्रतेसाठी कंत्राटदाराने सादर केलेल्या सर्व पात्र प्रकल्पांच्या कामगिरी गुणांचे, संबंधित पूर्ण झालेल्या कामाच्या मूल्याच्या आधारे भारित सरासरी काढण्यात येईल. त्यानंतर अंतिम कंत्राटदार मानांकन निश्चित करून कंत्राटदाराची हरित, पिवळी किंवा लाल श्रेणी ठरविण्यात येईल. या पद्धतीमुळे कंत्राटदाराची सातत्यपूर्ण कामगिरी विचारात घेतली जाणार असून, पायाभूत सुविधा क्षेत्रात गुणवत्ता, वेळेचे नियोजन, तांत्रिक क्षमता आणि जबाबदार प्रकल्प व्यवस्थापनाला अधिक महत्व मिळणार आहे. मोठ्या पायाभूत प्रकल्पांना विलंब झाल्यास नागरिकांना होणारी गैरसोय, प्रकल्पाचा अपेक्षित आर्थिक व सामाजिक लाभ मिळण्यास होणारा विलंब, खर्चवाढ, गुणवत्तेशी संबंधित समस्या तसेच करारविषयक वाद निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रकल्पाच्या संपूर्ण जीवनचक्रात कंत्राटदाराच्या कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याची ही व्यवस्था महत्वपूर्ण ठरणार आहे. शासनाने गुणवत्ता, वेळेत पूर्णता, सुरक्षा, कराराचे पालन आणि प्रकल्प व्यवस्थापन या सर्व बाबींवर आधारित संरचित मूल्यांकनाची तरतूद केली आहे. "महाराष्ट्रातील मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे केवळ वेळेत पूर्ण होणे पुरेसे नाही, तर ती गुणवत्तापूर्ण, सुरक्षित, टिकाऊ आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे. कंत्राटदारांच्या प्रत्यक्ष कामगिरीचे वस्तुनिष्ठ आणि पुराव्याधारित मूल्यांकन करणाऱ्या या कार्यपद्धतीमुळे चांगली कामगिरी करणाऱ्या कंत्राटदारांना प्रोत्साहन मिळेल, तर सातत्याने अपेक्षित कामगिरी न करणाऱ्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल. यातून सार्वजनिक निधीचा अधिक परिणामकारक वापर होऊन राज्यातील पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यास मदत होईल," असा विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात





### नमुंमपा शाळांतील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नवी मुंबई :** १७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून महाराष्ट्र परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने इयत्ता चौथी (प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ) व इयत्ता सातवी (उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ) शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जात आहे. यावर्षीही 26 एप्रिल 2026 रोजी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली होती. या शिष्यवृत्ती परीक्षामध्ये सर्व माध्यमातील तसेच सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. इयत्ता चौथीच्या 3283 विद्यार्थ्यांनी व इयत्ता सातवीच्या 2258 विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रवेशपत्र भरले होते. यामधील इयत्ता चौथीच्या 2955 व इयत्ता सातवीच्या 2050 विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात शिष्यवृत्ती परीक्षा दिली. या विद्यार्थ्यांमधून नमुंमपा शाळेतील इयत्ता चौथीच्या 42 विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता सातवीच्या 35 विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळालेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे हे द्योतक असून सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. यामध्ये नमुंमपा शाळा क्रमांक 31 कोपरखैरणे या शाळेतील अविनाश विनायक खैरनार हा विद्यार्थी इयत्ता चौथीसाठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सर्वाधिक 80 टक्के गुण मिळवून नवी मुंबई महानगरपालिका शाळांमधून प्रथम आलेला आहे. तसेच इयत्ता सातवीमध्ये नमुंमपा शाळा क्रमांक 76 घणसोली (हिंदी माध्यम) या शाळेतील विद्यार्थी सत्यम कुमार रोशन कुमार हा विद्यार्थी 89.9% गुण मिळवून महानगरपालिका शाळांमधून सर्वप्रथम आलेला आहे.नवी मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची ही यशस्वी कामगिरी कौतुकास्पद असून या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे महापौर सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अभिनंदन केले आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी अशोक कडुस यांच्या नियंत्रणाखाली शिक्षण विभागाने केलेले शिष्यवृत्तीच्या अभ्यासवर्गाचे तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्धतेचे नियोजन यशस्वी ठरले आहे. विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या या यशामागे शाळेतील मुख्याध्यापक व वर्गशिक्षक यांची मेहनत, मार्गदर्शन व सातत्यापूर्ण प्रयत्न महत्वाचे असून सराव वर्ग, मार्गदर्शिका, वैयक्तिक मार्गदर्शन अशा माध्यमांतून विद्यार्थ्यांना शाळा स्तरावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच दोन वेळा तालुका स्तरावर विद्यार्थ्यांना परीक्षेचे सवय व्हावी यादृष्टीने सराव परीक्षेचेही आयोजन करण्यात आले होते.

### चिल्ड्रन एड सोसायटीच्या कामकाजाचा आढावा

**मुंबई :** चिल्ड्रन एड सोसायटीचे २०२६-२०२७ हे शताब्दी वर्ष असून बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत सोसायटीकडील कामकाजाचा आढावा घेतला.महिला व बालविकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी चिल्ड्रन एड सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देत जागा उपलब्धेतनुसार या ठिकाणी करण्यात येणाऱ्या कामाचा सुधारित आराखडा सादर करण्याबाबतही त्यांनी सूचित केले.या बैठकीत रिक्त पदे भरणे, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढणे कार्यकारी समितीची बैठक नवीन आकृती पण प्रस्ताव पाठवणे यासह माटुंगा येथील कर्मचारी वसाहत मधील जागेबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

### भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती

**मुंबई :** महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते, त्यांनीही विविध उपयुक्त सूचना बैठकीत केल्या.

ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरविण्यात येईल अशी माहिती यावेळी देण्यात आली. अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.राज्यात किमान 25 हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## कृषी विद्यापीठांचे सेवा प्रवेश नियम अधिक सुसंगत करावे

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये एकसूत्रता आणून गुणवत्ता व ज्येष्ठतेला प्राधान्य मिळावे. सेवा प्रवेश नियम हे अधिक सुसंगत, गुणवत्ताधारित आणि राष्ट्रीय मानकांशी अनुरूप असावेत, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. आमदार रणधीर सावरकर यांच्यासह महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे तसेच चारही कृषी विद्यापीठांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सेवा प्रवेश नियमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शासनाने कृषी व पदुम विभागाच्या १० जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार चारही कृषी विद्यापीठांतील गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या चारही कृषी विद्यापीठांमध्ये सेवा प्रवेश नियमांची समान अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली.

सेवा प्रवेश नियम निश्चित करताना 'गुणवत्ता व ज्येष्ठता' हे प्रमुख तत्व ठेवण्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. शिक्षकवर्गीय तसेच शिक्षकेतर पदांसाठी सेवा प्रवेशाची प्रक्रिया निश्चित करताना संबंधित कायदे, परिनियम आणि शासन निर्णय यांचा आधार घेण्यात आला आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शक तत्वांचाही विचार करण्यात आला आहे. चारही कृषी विद्यापीठांमध्ये सेवा प्रवेश नियमांची एकसमान अंमलबजावणी व्हावी, यासाठी परिनियमांमधील संबंधित तरतुदींचा आधार घेऊन नियम तयार करण्याचा प्रस्ताव आहे. विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर तसेच राष्ट्रीय स्तरावरील मानकांवर होणाऱ्या परिणामांचाही विचार करण्याचे निर्देश यावेळी कृषी मंत्री भरणे यांनी दिले.सेवा प्रवेश नियमांमध्ये शिक्षकवर्गीय पदांसाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावली व मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्यात आला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ आणि परिनियम, १९९० मधील तरतुदींचाही आधार घेण्यात आला आहे. शिक्षकेतर पदांसाठीही महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम व परिनियमांमधील तरतुदी तसेच प्रचलित शासन निर्णयांच्या आधारे सेवा प्रवेश नियम निश्चित केले जावे, असे कृषी मंत्री भरणे यांनी सांगितले.चारही कृषी विद्यापीठांमध्ये शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सेवा प्रवेशाची प्रक्रिया अधिक स्पष्ट, पारदर्शक आणि गुणवत्ताधारित करण्याच्या दृष्टीने एकसमान नियम निश्चित करावे.

## महाविद्यालयांच्या कामकाजाला गती : प्रशासकीय कामकाज होणार डिजिटल

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक, सुरक्षित आणि कागदरहित करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'ई-ऑफिस प्रणाली'चे लोकार्पण उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उपसचिव प्रताप लुबाळ, उपसचिव अशोक मांडे, सहासंचालक डॉ अर्चना बोऱ्हाडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, या प्रणालीमुळे राज्यातील १,२३१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे प्रशासकीय कामकाज डिजिटल माध्यमातून अधिक सुलभ आणि कार्यक्षम होणार आहे. ई-ऑफिस प्रणालीमुळे महाविद्यालये, विभागीय सहसंचालक कार्यालये, उच्च शिक्षण संचालनालय तसेच मंत्रालयातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यातील पत्रव्यवहार आणि प्रशासकीय प्रक्रिया डिजिटल माध्यमातून सुलभ होणार आहेत. शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून कामकाज गतिमान करणे, दस्तऐवज व माहिती सुरक्षित ठेवणे आणि निर्णय प्रक्रिया अधिक जलद व परिणामकारक करणे हा या प्रणालीमागील प्रमुख उद्देश आहे.उच्च शिक्षण संचालनालयाच्या कार्यक्षेत्रात कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण आणि समाजकार्य आदी विविध शाखांची एकूण १,२३१ अशासकीय अनुदानित महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमधून संबंधित विभागीय कार्यालये आणि मंत्रालयाशी मोठ्या प्रमाणावर पत्रव्यवहार व प्रशासकीय कामकाज केले जाते. पारंपरिक पद्धतीमध्ये कागदपत्रांचे स्कॅनिंग, टपालाद्वारे पत्रव्यवहार, कागदपत्रांची हाताळणी आणि फाईलच्या पाठपुराव्यासाठी लागणारा वेळ, मनुष्यबळ व खर्च यामुळे प्रशासकीय प्रक्रियेला विलंब होतो. ई-ऑफिस प्रणालीमुळे या अडचणी दूर होऊन कामकाजाला डिजिटल गती मिळणार आहे.असेही मंत्री चंद्रकातदादा पाटील यांनी सांगितले. या उपक्रमांतर्गत प्रत्येक महाविद्यालयासाठी स्वतंत्र ई-ऑफिस उपलब्ध करून देण्यात आले असून ते संबंधित महाविद्यालयाच्या नावाने कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयाचे ई-ऑफिस 'सेवार्थ आयडी'शी संलग्न करण्यात आले आहे. त्यामुळे ई-फाईल, ई-टपाल, पत्रव्यवहार, प्रस्ताव, अहवाल आणि परिपत्रक यांचे व्यवस्थापन अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने करता येणार आहे.ई-ऑफिस प्रणालीद्वारे अशासकीय अनुदानित महाविद्यालय, उच्च शिक्षण संचालनालय, विभागीय सहसंचालक कार्यालय, मंत्रालयातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग अशा सर्व स्तरांवरील पत्रव्यवहार डिजिटल माध्यमातून जोडला जाणार आहे. महाविद्यालयाचे नाव किंवा सेवार्थ आयडी शोध निकष म्हणून वापरून संबंधित ई-टपाल, पत्र, प्रस्ताव, अहवाल अथवा परिपत्रक सहजपणे शोधता येणार आहे. या प्रणालीमुळे महाविद्यालयीन स्तरावरील प्रशासकीय प्रक्रियांचे डिजिटल रूपांतर होऊन पेपरलेस कार्यसंस्कृतीला चालना, कार्यक्षमता वाढ, फाईल नोंदींची तात्काळ उपलब्धता, कालबद्ध कार्यवाही, दस्तऐवजांचे सुरक्षित जतन आणि माहितीचा शोध व वापर अधिक सुलभ होणार आहे. तसेच प्रशासकीय कामकाजातील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जबाबदारी वाढण्यास मदत होणार आहे.ई-ऑफिसमुळे टपाल, स्कॅनिंग, कागदपत्रे आणि इतर आनुषंगिक खर्चात बचत होऊन पर्यावरणपूरक आणि शाश्वत प्रशासनाला चालना मिळणार आहे. त्याचबरोबर फाईलच्या हालचालींचे डिजिटल पद्धतीने व्यवस्थापन होत असल्याने निर्णय प्रक्रियेला अधिक वेग मिळणार आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील डिजिटल गव्हर्नन्स अधिक गतिमान, पारदर्शक, उत्तरदायी आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## "असंख्य पिढ्यांच्या संगोपनाचे दायित्व शिक्षकांच्या हाती" : प्रा. वा. ना. आंधळे

## आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ **पिंप्री : प्रतिनिधी**

"शिक्षक हा देशाच्या सद्यस्थितीतील मोठा आधार असून राष्ट्रभक्ती, समाजप्रेम, मानवता, सहिष्णुता, सकारात्मकता आणि एकात्मता या मूल्यांची रुजवात शिक्षकच करू शकतो. त्यामुळे शिक्षकाची भूमिका ही आईच्या भूमिकेसारखी असणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी प्रा. वा. ना. आंधळे यांनी केले. आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे आयोजित स्वातंत्र्य दिन सोहळ्यात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.

प्रा. आंधळे पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षक व पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. अध्ययन हेच विद्यार्थ्यांचे प्रमुख उद्दिष्ट असावे आणि यशप्राप्तीचे ध्येय समोर ठेवून त्यांनी सक्षम राष्ट्र उभारणीत योगदान द्यावे. यावेळी त्यांनी संस्थेचे व शिक्षकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक केले.

आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. वा. ना. आंधळे होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांची गावातून भव्य रॅली काढण्यात आली. देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगत, समूहगीत गायन, देशभक्तीपर गीतांवरील नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले मानवी मनोरे विशेष आकर्षण ठरले.

यावेळी माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता दहावी तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला. तसेच आंतरशालेय स्पर्धा, गणित जत्रा आणि रांगोळी स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




### प्रा. वा. ना. आंधळे यांचा विशेष साहित्यिक गौरव

**प्रा. वा. ना. आंधळे यांच्या कवितासंग्रहावर मराठवाडा विद्यापीठातील श्री. ज्ञानसागर संतोष सूर्यवंशी यांनी पीएच.डी. संशोधन केले आहे. तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रा. आत्माराम चिमकर यांनीही त्यांच्या साहित्यावर पीएच.डी. संशोधन केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय साहित्यिक योगदानाचा गौरव म्हणून वेदमाता गायत्री बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने प्रा. वा. ना. आंधळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यामधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास वेदमाता गायत्री बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अण्णासो मधुकर रामजी चौधरी, उपाध्यक्ष श्री. प्रमोद चौधरी, सचिव श्री. विनोद चौधरी, श्री. डी. एन. पाटील सर, डॉ. पिंगळे सर, श्री. विजय पाटील, भोदचे सरपंच श्री. संदीप पाटील, सौ. वैशाली चौधरी मॅडम (मुख्याध्यापिका, आदर्श प्राथमिक शाळा), श्री. संदीप सपकाळे (मुख्याध्यापक, आदर्श माध्यमिक शाळा) तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालकवर्ग व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. के. शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. एस. पाटील यांनी मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा सन्मान, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रेरणादायी अध्यक्षीय मनोगत यामुळे आदर्श प्राथमिक व माध्यमिक शाळा, पिंप्री येथील स्वातंत्र्य दिन सोहळा अविस्मरणीय ठरला.**

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, मंगळवार, 18 ऑगस्ट 2026

Last page



# आष्टीत अवैध कत्तलखान्यांचा आरोप; पोलिसांच्या गस्तीवरच प्रश्नचिन्ह

## गाई-वासरांचे अवशेष शिवारात; कारवाई न झाल्यास गणपती फाटा येथे रास्ता रोकोचा इशारा

**आष्टी (प्रतिनिधी )**

कासारी-मुर्शदपूर हद्दीतील वारूंगळे वस्ती व शिंदेवाडी शिवारात गाई-वासरांचे मुंडके व मांसाचे अवशेष आढळत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दुर्गंधी आणि भटक्या कुत्र्यांच्या वाढलेल्या वावरामुळे शेतकरी व महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या प्रकरणी ग्रामस्थांनी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. शहरातील कत्तलखाने बंद असून पोलिसांची नियमित गस्त सुरू असल्याचा दावा केला जात असेल, तर मग शिवारात हे अवशेष येतात कुठून? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

कत्तलखाने बंद असल्याचे सांगूनही मांसाचे अवशेष खुलेआम शिवारात आढळत असतील, तर पोलिसांची गस्त नेमकी कुठे आणि कोणासाठी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. या अवशेषांचा उगम शोधून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यासोबतच आष्टी शहरातील कथित अवैध दारूविक्रीवरही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला आहे. दारूबंदी विभागाचे कार्यालय शहरात असतानाही अवैध दारूविक्री सुरू असल्याचा आरोप असेल, तर यंत्रणा नेमकी करतेय तरी काय? असा सवाल करण्यात आला.

दरम्यान, प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास मुलाबाळांसह गणपती फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता पोलिस प्रशासन या गंभीर आरोपांची चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी दिलेल्या निवेदनावर आष्टी शहराचे नगराध्यक्ष जीया बेग,सरपंच अशोक मुळे,नगरसेवक रंगनाथ धोंडे, सुनील रेडेकर, ग्रामपंचायत सदस्य कपिल अग्रवाल, बंडू गीते, मनोज धनवडे,सचिन काकडे, रामदास दरेकर, अमोल दरेकर,संतोष खंडागळे, बाबासाहेब वारंगुळे, शुभम दरेकर, हनुमंत काकडे,सुनील वारंगुळे, लहू केरळकर, दीपक वारंगुळे, वाल्मीक वारंगुळे, बंडू केरुळकर,शहादेव केरूळकर, चंद्रकांत वारंगुळे, वाल्मीक वारंगुळे, प्रकाश वारंगुळे,यश केरूळकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पोलिसांचा तो खबऱ्या कोण?

आष्टी शहरात अवैध कत्तलखाने आणि अवैध दारूविक्रीची माहिती पोलिसांना मिळते; मात्र कारवाईसाठी पोलीस ज्या दिशेने निघतात, त्याआधीच संबंधितांना खबर मिळत असल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. विशेष म्हणजे, पोलीस ज्या दिशेने कारवाईसाठी जातात, त्याच दिशेने पोलिसांमधीलच एक कथित खबऱ्या फिरत असल्याची चर्चा असून, पोलीस येत असल्याची खबर तोच संबंधितांना देतो आणि त्यामुळे पोलीस घटनास्थळी पोहोचेपर्यंत सर्व काही 'साफ' झालेले असते, अशी नागरिकांमध्ये कुजबुज आहे.जर ही चर्चा खोटी असेल तर पोलिसांनी ती खोटी असल्याचे स्पष्ट करावे; आणि खरी असेल तर पोलिसांच्या हालचालींची माहिती बाहेर कोण पोहोचवत आहे, याचा शोध घेण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल आष्टीकर विचारत आहेत. पोलिसांच्या कारवाईपूर्वीच आरोपी सावध होतात, तर पोलिसांच्या यंत्रणेतच 'खबर' कुठे लीक होते? या प्रश्नाचे उत्तर आता पोलिस प्रशासनाने जनतेला द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# वडिलांची 29 वर्षांची परंपरा कायम; लातूरच्या 500 भाविकांची भव्य शिवकावड प्रभू वैद्यनाथाच्या चरणी!

**परळी वैजनाथ/ प्रतिनिधी**

पवित्र श्रावण महिन्यानिमित्त पंचम ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी लातूर ते परळी अशी भव्य-दिव्य शिवकावड यात्रा रविवारी, दि. 16 ऑगस्ट रोजी सायंकाळी वैद्यनाथ नगरीत दाखल झाली. लातूर शहरातील मोतीनगर भागातील ललितकुमार बालकिशन शर्मा परिवाराच्या वतीने या शिवकावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.



सुमारे 500 भाविकांचा सहभाग असलेल्या या कावड यात्रेचे परळीत मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताका आणि 'हर हर महादेव', 'जय भोले', 'वैद्यनाथ भगवान की जय' अशा जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी यात्रेच्या स्वागतासाठी मोठी तयारी केली होती. त्यामुळे या यात्रेला पारंपरिक धार्मिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

दरम्यान, या शिवकावड यात्रेला यंदा विशेष भावनिक पार्श्वभूमी लाभली. लातूरच्या मोतीनगर भागातील कै. बालकिशन शर्मा यांनी सुमारे 29 वर्षांपूर्वी मोजके मित्र व नातेवाईक यांना सोबत घेऊन लातूर ते परळी शिवकावड पदयात्रेची सुरुवात केली होती. दरवर्षी ही यात्रा काढताना परिसरातील नागरिक व नातेवाईक या यात्रेत सहभागी होत गेले आणि भाविकांची संख्या वाढत गेली.काही महिन्यांपूर्वी बालकिशन शर्मा यांचे वयाच्या 75 व्या वर्षी आजारपणामुळे निधन झाले. वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबाचा मुख्य आधार गमावल्याचे दुःख असतानाही चारही भावांनी वडिलांची परंपरा पुढे सुरू ठेवण्याचा निर्धार केला. श्रावण महिना सुरू झाल्यानंतर त्यांनी पुन्हा शिवकावड पदयात्रा काढण्याचा निर्णय घेतला आणि तयारीला सुरुवात केली. "वडिलांच्या निधनानंतरही त्यांची श्रद्धा आणि परंपरा पुढे नेत आम्ही यंदाची शिवकावड यात्रा काढत आहोत. ही यात्रा आमच्यासाठी केवळ धार्मिक यात्रा नसून वडिलांच्या स्मृतींना वाहिलेली श्रद्धांजली आहे," अशी भावना ललितकुमार बालकिशन शर्मा व विजयकुमार शर्मा (व्यापारी, लातूर) यांनी व्यक्त केली.

# परळी ग्रामीण तलाठी सज्जा बदलण्याची मागणी;


## शेतकरी व नागरिकांच्या कामांकडे दुर्लक्ष - भागवत गीत्ते

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा तात्काळ बदल करण्यात यावा, अशी मागणी मलकापूर येथील भागवत रामकिशन गित्ते यांनी उपविभागीय अधिकारी, परळी वैजनाथ यांच्याकडे दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी लेखी अर्जाद्वारे केली आहे.

अर्जात नमूद केल्यानुसार, परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा कार्यभार तलाठी प्रतीक्षा बसापुरे या मागील सुमारे दोन वर्षांपासून सांभाळत आहेत. मात्र, या कालावधीत शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांची कामे अपेक्षित पद्धतीने होत नसल्याचा आरोप अर्जदाराने केला आहे.तलाठी सज्जाचा कारभार त्यांच्या हाताखालील व्यक्तींच्या माध्यमातून चालविला जात असल्याचा दावाही अर्जात करण्यात आला आहे. तसेच, परळी ग्रामीण परिसरातील रस्त्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये इतर व्यक्तींकडून पंचनामे तयार करून





प्रति,
मा.उपविभागीय अधिकारी साहेब,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
परळी वै ता.परळी वै.जि.बीड

दिनांक. १३/०८/२०२६

विषय:- परळी ग्रामीन तलाठी सज्जा.परळी वै चा तलाठी सज्जा बदलणे बावत.

महोदय,

वरील विषयी विनंती अर्ज सादर करण्यात येतो की, मी आपल्या कार्यालयात ग्रामीन तलाटी सज्जा.परळी वै चा तलाठी सज्जा बदलणे बाबत अर्ज सादर करीत आहे.मौजे.परळी ग्रामीण चे तलाठी प्रतीक्षा बसापुरे हया मागील दोन वर्षापासुन आहे. परळी ग्रामीण तलाठी सज्जा.परळी वै यांनी गेल्या ०२ वर्षापासून सध्याचा कार्यभार घेतलेला आहे.कार्यभार घेतलेला असल्यापासून त्यांनी शेतक-यांची अथवा जनतेची कसल्यास प्रकारची कामे केलेली नाहीत.त्यांच्या हाताखाली मानसे ठेऊन सज्जाचा कारभार चालवित आहेत.तसेच परळी ग्रामीण भागात रस्त्याच्या बाबतीत दुस-यांकडून पंचनामे तयार करुन घेऊन चुकीची दाखल केलेले आहे.त्यांचे हाताखालील मानसे मनाला वाटल तेवढे पैसे मागतात.व चुकीची कामे करतात.

तरी मे.साहेबांनी ग्रामीन तलाटी सज्जा.परळी वै चा तलाठी सज्जा बदली तात्काळ करण्यात यावी हि नम्र विनंती.

अर्जदार
भागवत रामकिशन गित्ते
रा.मलकापुर ता.परळी वै
जि.बीड मो.नं.९७३०१३८२१३

13/08/2026

प्रतिलीपी.
१. मा.जिल्हाधिकारी साहेब,जिल्हाधिकारी कार्यालय,बीड यांना माहितीस्तव.
२. मा.तहसीलदार साहेब,तहसील कार्यालय,परळी वै यांना माहितीस्तव

घेण्यात आले असून, काही नोंदी चुकीच्या पद्धतीने दाखल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, तलाठी कार्यालयाशी संबंधित कामांसाठी त्यांच्या हाताखालील व्यक्तींकडून मनमानी पद्धतीने पैशांची मागणी केली जात असल्याचेही अर्जदाराने म्हटले आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.या सर्व तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी आणि परळी ग्रामीण तलाठी सज्जाचा तात्काळ बदल करावा, अशी मागणी भागवत रामकिशन गित्ते यांनी केली आहे.

# स्वराजचा आधुनिक तंत्रज्ञानासह ८५५ प्रोटेक सीरीजचा ट्रॅक्टर सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये दाखल; आ.सुरेश धस यांच्या हस्ते भव्य अनावरण सोहळा

**कडा । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या वाढत्या अपेक्षा आणि आधुनिक शेतीच्या गरजा लक्षात घेऊन स्वराज कंपनीने नवीन लॉन्च केलेला आधुनिक तंत्रज्ञानासह शेतीतील विविध कामांसाठी उपयुक्त सुविधा देणारा Swaraj 855 FE Protek ट्रॅक्टर आष्टी येथील सावळेश्वर ट्रॅक्टर्समध्ये दाखल झाला आहे. या नव्या ट्रॅक्टरच्या आगमनामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.१५ ऑगस्ट च्या राष्ट्रीय सणाच्या मुहुर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर येथे या नवीन ट्रॅक्टरचे अनावरण सोहळा आ.सुरेश धस यांच्या हस्ते शेकडो शेतकरी बांधवांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.



आष्टी तालुक्यात ट्रॅक्टर उद्योग जगतात विश्वसनीय नाव म्हणजे सावळेश्वर ट्रॅक्टर असून जलद व विश्वसनीय सेवा दिल्याबद्दल सावळेश्वर उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांनी हजारो शेतकरी बांधवांचा विश्वास संपादन केला असल्याने ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर खरेदीची ओढ सावळेश्वर ट्रॅक्टर कडे असते या स्वराज कंपनीच्या अधिकृत डिलर असलेल्या शोरुम मध्ये स्वराज 855 FE Protek हा आधुनिक तंत्रज्ञानासह असलेला ट्रॅक्टर १५ ऑगस्ट रोजी दाखल झाला असून या ट्रॅक्टर ची खास वैशिष्ट्ये म्हणजे हा ५० एचपी क्षमतेचा ट्रॅक्टर असून, त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानासह शेतीतील विविध कामांसाठी उपयुक्त सुविधा देण्यात आल्या आहेत. ऑईल इमर्स्ड ब्रेक्स,पावर टेरींग,जीपीएस,पॉवर-सेंस लिफ्ट, ड्युरा-टफ ॲक्सल, ड्युरा-मॅक्स क्लच, कम्फी-फ्लॅट डेक आणि डिजिटल क्लस्टर यांसारखी वैशिष्ट्ये आहेत.या मॉडेलमध्ये २५०० किलोपर्यंतची हायड्रॉलिक लिफ्ट क्षमता, विविध पीटीओ पर्याय तसेच 2WD आणि 4WD पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे नांगरणी, पेरणी, वाहतूक, अवजड शेती अवजारे चालविणे यांसह ऊस वाहतुकीसाठी दमदार मॉडेल तसेच ( डोझर) फळीच्या कामांसाठी हा ट्रॅक्टर उपयुक्त ठरणार आहे.

सावळेश्वर ट्रॅक्टरमध्ये स्वराज 855 FE Protek दाखल झाल्याने शेतकऱ्यांना या नव्या मॉडेलची माहिती, प्रत्यक्ष पाहणी व डेमोची सुविधा मिळणार आहे. आधुनिक सुविधा, दमदार कामगिरी आणि शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला हा ट्रॅक्टर शेतीसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले.हा अनावरण सोहळ्यास आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते व परिसरातील शेतकरी, ग्राहक, सावळेश्वर ट्रॅक्टरचे पदाधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते. नवीन स्वराज ८५५ प्रोटेक सीरीजला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**नवीन तंत्रज्ञानासह विकसित करण्यात आलेला हा ट्रॅक्टर शेतीची कामे अधिक सुलभ आणि कार्यक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. शेतकऱ्यांसाठी स्वराजच्या नवीन ८५५ प्रोटेक सीरीज ट्रॅक्टरची बुकिंग सुरू करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, दमदार कार्यक्षमता आणि शेतीच्या विविध कामांसाठी उपयुक्त सुविधांनी सुसज्ज असलेल्या या ट्रॅक्टरचा परिसरातील इच्छुक शेतकऱ्यांनी सावळेश्वर ट्रॅक्टर येथे संपर्क साधून ८५५ प्रोटेक सीरीज ट्रॅक्टरची बुकिंग करून या आधुनिक ट्रॅक्टरचा लाभ घ्यावा - रमेश दादा आजबे ( सावळेश्वर ट्रॅक्टर्स,आष्टी) मो.8055998055**